(Marathi)

1014
९।४

1353 24 P

94 P

1353 Marathi

1014
919

B53 Marathi

॥ वंदे मातरम् ॥

1353
mar.
IMPERIAL RECORD
RECEIVED
16 FEB 1932




# सरदार भगतसिंगाचा
## पोवाडा

प्रकाशकः— शंकर कवि वरवंडकर

भाग १ ला
आवृत्ती ४ थी,
प्रती २०००
सन १९३१ इसवी

किंमत अर्धा आणा

1353

ARCHIVES LIBRARY
No 1353
Date 12-1-72
GOVT. OF INDIA

[ हिरे हरपले ]

# सरदार भगतसिंगाचा पोवाडा.

( चाल:- भावधरारे )

हुतात्मे गेले—दीन दुःख निवारणवाले ॥ धृ० ॥

तो भगतसींग सरदार ।
सुखदेव राजगुरुवीर ॥
घेऊन हातामध्यें शीर ।
लढुनी गेले—दीन दुःख निवारणवाले ॥ १ ॥

हिंददेश वैभवशाली ।
झुरे मान घालुनी खाली ॥
तेव्हां हे आमुचे वाली ।
धांवत आले—दीन दुःख निवारणवाले ॥ २ ॥

पाहुनी दैन्य देशाचें ।
कळवळले हृदय वीरांचे ।
ठरविलें कार्य करण्याचें ॥
लढणेवाले—रणरंगणी नाचत आले ॥ ३ ॥

देश भक्तीनें प्रेरित झाले ।
हिंदभूमिचें सेवक बनले ॥
धर्मोद्धारासाठीं लढले ।
क्रांतिवाले—आदर्श संतसम झाले ॥ ४ ॥

परतंत्र भारत भूला ।
करुं स्वतंत्र निश्चय केला ॥
सोडिले घरा दाराला ।
नाहीं भ्याले—मरणास हिम्मतवाले ॥ ५ ॥

सरदार भगतासिंगानीं ।
राजगुरू सुखदेवानीं ॥
अजरामर कीर्ती करूनी ।
फांसी गेले—दीन दुःख निवारणवाले ॥ ६ ॥

कवि शंकर जोडुनी हात ।
बांधवांस विनवी त्वरित ॥
कां बसला आतां स्वस्थ ।
पहा ते—गेले—शूर वीर क्रांतीवाले ॥ ७ ॥

## पंडीत मोतीलाल नेहरूचा पाळणा

( चाल:- अजि अक्रूर हा )

आजी नेहरूजी सोडुनी गेले आपणाला ।
काळानें डाव साधियला ॥ धृ० ॥

महाराष्ट्राचा मुकुटमणी तो गेला ।
हिंदभूस धक्का बसला ॥
हा दुःखाचा पर्वत हो कोसळला ।
कीं सूर्य जसा मावळला ॥
दीन दुनियेची कळकळ अतिशय ज्याला ।
तो शूरवीर हारपला ॥
लक्ष्मीने गौरव केला ।
विव्दत्तेंत नंबर पहिला ।
कुशल तो राजनीतीला ।
श्री खंडीतो प्रेमी अतिशय झाला ।
कवि शंकर करि वंदन त्याला ॥ १ ॥

[ चाल— मजा देते हैं क्या यार ]

मुडदार बने है यार । ए दारू पीनेवाले ॥ धृ० ॥
जबलगी दारुकी प्यास । तब जावे पिठेके पास ।
लिया पावशेरका गल्लास । ए उल्लू बननेवाले ॥ १ ॥
जब आयी दारुकी तार । तब निकले पिठेके बहार ।
करे लोकसे तक्रार । ए मार खानेवाले ॥ २ ॥
जब मार पडे बेमार । तब गाली देवे यार ।
देखके आया चौकीदार । ए पकड जाने वाले ॥ ३ ॥
पकड गया चौकीपर । रखे खोलीके अंदर ।
सुबू निकाले बहार । मू काला बतानेवाले ॥ ४ ॥
खडा करते हैं जमादार । अब कहे हैंजी नादार ।
दंड हूवे रुपिया दो-चार । चौकीमे बेठनेवाले ॥ ५ ॥
ऐसा दारबाजका डंका । बजे सब लोकोमे बाका ।
छीः थू हूवे जाके रुका घर जाकर रोनेवाले ॥ ६ ॥

---

[ चाल— मला मुंबईला जायचे ]

आरर गांधीची तकली । परदेशाचे बोडांडी बसली ॥ धृ०
तकली आली देशात । अगही साध्या वेशां
आब्रू धूर्तांची बाजारी विकली ॥ १ ॥
तकली चरख्याची पोर । मोठी झाली शिरजोर
झाला मँचेस्टरचा माल नकली ॥ २ ॥
बारीक तकलीची तार । जशी पट्टयाची धार
हिने मल मल साटीन डग कापली ॥ ३ ॥

Acc no. 1353

तिवारी प्रिंटिंग प्रेस नासिक

26 AUG 2008

Supreme court